साप्ताहिक

# पुणेरी चळवळ

संपादक : सुनिल बालकिसन गोयल
मो. ९८६३६४६४६४

■ RNI No: MAHMAR/2020/87539
www.punerichalval.co.in

■ वर्ष ५ थे ■ अंक ३९ ■ पुणे, गुरुवार २५ सप्टेंबर २०२५ ते १ ऑक्टोंबर २०२५ ■ मुल्य : २ रु ■ पाने ४

■ Volum 5 ■ Issue : 39 ■ Pune, Thursday, 25 September 2025 to 1 October 2025 ■ Price : 2 Rs/- ■ Pages : 4

## तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या दुरुस्ती आणि रस्ता रुंदीकरणासाठी ५९.७५ कोटींचा निधी मंजूर

**पुणे :** तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाची दुरुस्ती आणि रस्तारुंदीकरणासाठी ५९.७५ कोटींच्या निधीला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. दुरुस्ती आणि रस्ता रूंदीकरणाच्या कामांनंतर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होईल आणि अपघातांचा धोकाही टाळून औद्योगिक क्षेत्राला दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

तळेगांव-चाकण-शिक्रापूर या मार्गात तळेगांव ते चाकण दरम्यान चार पदरी उन्नत मार्ग आणि जमिनीस समांतर चार पदरी रस्ता तसेच चाकण ते शिक्रापूर दरम्यान सहा पदरी रस्ता या कामाचा समावेश आहे. हे संपूर्ण काम बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) तत्वावर बांधण्यात येणार आहे.

या मार्गाचा समावेश पूर्वी राज्य रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ अंतर्गत करण्यात आला होता. त्यानंतर केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी असा दर्जा दिला असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून तो महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडे (एमएसआयडीसी) हस्तांतरित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत तळेगाव-चाकण-शिक्रापूर हा महामार्ग अतिवृष्टीमुळे खचला असून, रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि रुंदीकरण आवश्यक झाले आहे. हा मार्ग औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचा असल्यामुळे येथे आवजड वाहतुकीची मोठी वर्दळ असते. परिणामी, वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि रस्ता सुरक्षेच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. हा महामार्ग परिसरातील मुख्य रस्त्यांना जोडणारा एकमेव महत्त्वाचा रस्ता असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने दुरुस्तीची मागणी होत होती.

यासंदर्भात पुणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागीय अधिकाऱ्यांची जुलै महिन्यात बैठक झाली होती. या बैठकीत रस्त्याच्या दुरुस्ती आणि रुंदीकरणासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार शासनस्तरावर पाठपुरावा करून आता आवश्यक निधीस मान्यता देण्यात आली आहे.

## राज्याला पुन्हा धोका

■ **आयएमडीचा हाय अलर्ट धडकणार मोठे संकट, धोका वाढला**

पुणे/मुंबई : महाराष्ट्राला पावसाने झोडपून काढले आहे. पावसामुळे राज्यात मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. दरम्यान पुन्हा एकदा हवामान विभागाकडून राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पुढील पाच दिवस मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार असून येत्या २५ सप्टेंबर पासून ते २९ सप्टेंबरपर्यंत पावसाचा धोका कायम आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होणार आहे. तर २७ सप्टेंबरला राज्यभरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

पुढील २४ तासांमध्ये बंगालच्या उपसागरात कमी दबाचा पट्टा निर्माण होणार आहे, त्यामुळे



पुढचे पाच दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या इशा-यानुसार २५ सप्टेंबर पासून ते २९ सप्टेंबरपर्यंत राज्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. तर येत्या २७ सप्टेंबरला मराठवाड्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे याच काळात विदर्भात देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पुढील पाच दिवस मराठवाडा आणि विदर्भाला पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. दरम्यान बंगालच्या उपसागरात निर्माण होणा-या कमी दाबाच्या पट्ट्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार बांधवांना समुद्रात न जाण्याचे आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आले आहे.

### पावसामुळे मोठे नुकसान

राज्यात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे, पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्याला तर पावसाचा सर्वात मोठा फटका बसला आहे. उभी पिके पाण्याखाली गेली असून शेतकरी हवालदिल झाली आहेत, नद्यांना आलेल्या पुरामुळे तर परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. पुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून अनेक जण गावातच अडकले आहेत, त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सुरू आहे. पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्त भागांना भेटी देऊन, नुकसानीचा आढावा घेतला.

## १०.९० लाख रेल्वे कर्मचा-यांना दिवाळी बोनस

■ **७८ दिवसांचे वेतन मिळणार**

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी रेल्वे कर्मचा-यांना १,८६६ कोटी रुपयांचा प्रोडक्टीव्हीटी लिंक्स बोनसला मंजूरी दिली आहे. त्यामुळे चांगल्या कामगिरीसाठी १०.९० लाख कर्मचा-यांना त्याचा लाभ मिळणार आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे की हा बोनस त्यांच्या ७८ दिवसांच्या वेतना इतका असणार आहे. गेल्यावर्षी देखील मोदी सरकारने रेल्वे कर्मचा-यांना २,०२९ कोटी रुपयांचा बोनस मंजूर केली होता, त्यामुळे ११,७२,२४० कर्मचा-यांना त्याचा लाभ झाला होता.

एका पात्र रेल्वे कर्मचा-याला ७८ दिवसाच्या कमाल देय रक्कम १७,९५१ रुपये आहे. ही रक्कम विविध प्रकारच्या रेल्वे कर्मचा-यांना दिली जाईल. यात रेल्वे ट्रॅक मेन्टेनर, लोकोमोटीव्ह पायलट, ट्रेन मॅनेजर ( गार्ड ), स्टेशन मास्तर,सुपरवायझर, तंत्रज्ञ, तंत्रज्ञ हेल्पर, पॉईंट्समन, मंत्रालयीन कर्मचारी आणि अन्य सी ग्रुप कर्मचा-यांचा समावेश आहे.

शहरी आणि सेमी अर्बन दोन्ही बाजारात सर्वात मोठा ग्राहक समुहांपैकी एक, रेल्वे कर्मचा-यांना बोनस मिळाल्याने घरगुती खर्चात थेट वाढ होणार असल्याचे म्हटले जात आहे. इलेक्ट्रॉनिक आणि ड्युरेबल गूड्स पासून ते कपडेलत्ते आणि सणासुदीच्या गरजेच्या वस्तू, दिवाळीच्या तोंडावर खर्च करण्यासाठी बाजारात पैसा मिळणार आहे. दिवाळीपूर्वी जास्त खर्च करण्यायोग्य उत्पन्नामुळे सामान्यत: किरकोळ विक्रीत वाढ होते.

## बांगलादेशाला लोळवत भारत आशिया चषकाच्या अंतिम फेरीत

**दुबई :** आशिया कप २०२५ च्या सुपर फोरमधील महत्त्वाच्या सामन्यात भारताने तूफानी कामगिरी करत बांगलादेशचा पराभव केला आणि थेट फायनलमध्ये प्रवेश केला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची या आशिया कप २०२५ मध्ये चांगली कामगिरी राहिली आहे. दुबईत अभिषेक शर्मा आणि शुभमन गिलच्या वादळी खेळीनंतर १६८ स्कोर उभारला. नंतर गोलंदाजांनीही उत्कृष्ट मारा करत बांगलादेशी फलंदाजांना रोखून धरले. या विजयामुळे भारताने आशिया कप २०२५ च्या अंतिम फेरीत जागा पक्की केली असून पुन्हा एकदा विजेतेपद पटकावण्याची संधी आहे.

बांगलादेशने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. सुरुवातीच्या तीन षटकांत बांगलादेश गोलंदाजांनी चांगलाच जोर दाखवला आणि स्कोअर फक्त १७ धावांवर रोखून धरला. पण चौथ्या षटकात तब्बल २१ धावा फटकावत भारताने लय पकडली. पहिले ३ षटके १७ धावा वरून पुढची ३ षटके गिल आणि अभिषेकच्या जोरावर तब्बल ५५ धावा केल्या. असे करीत टीम इंडियाने पॉवरप्ले संपेपर्यंत एकही विकेट न गमावता ७२ धावा केल्या. मात्र गिलला मिळालेली चांगली सुरुवातीनंतर तो २९ धावांवर माघारी परतला. पाकिस्तानविरुद्ध ७४ धावांची खेळी साकारल्यानंतर अभिषेक शर्मा पुन्हा एकदा शतकाच्या उंबरठ्यावर थांबला. बांगलादेशविरुद्ध त्याने अवघ्या २५ चेंडूत अर्धशतक झळकावले आणि दमदार ७५ धावांची खेळी केली, पण तो दुर्दैवाने रनआऊट झाला.

## सीबीएसईकडून १० वी, १२ वी परीक्षेच्या संभाव्य तारखा जाहीर

■ **१७ फेब्रुवारीपासून सुरु होऊ शकतात परीक्षा**

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने(सीबीएसई) साल २०२६ च्या दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांचा अंदाजित तारखा जाहीर केल्या आहेत. अधिकृत सूचनेनुसार या परीक्षा १७ फेब्रुवारी ते १५ जुलै २०२६ दरम्यान देशभर आणि परदेशात घेतल्या जाऊ शकतात. बोर्डाने सांगितले की याचा उद्देश विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांना वेळेत वेळापत्रक तयार करण्यास मदत करणे हा आहे. देश आणि विदेशातून या परीक्षांना ४५ लाखांहून अधिक विद्यार्थी बसणार आहेत.

सीबीएसईच्यावतीने जारी केलेल्या कार्यक्रमात इयत्ता १० आणि १२ वीच्या मुख्य परीक्षा, क्रीडा विद्यार्थी साठी विशेष परीक्षा, इयत्ता १० वीची द्वितीय बोर्ड परीक्षा आणि इयत्ता १२ वीची पूरक परीक्षा यांचा समावेश आहे. बोर्डाने हे स्पष्ट केले आहे की मुख्य परीक्षांसोबतच प्रायोगिक कार्य, मुल्यांकन, उत्तर पत्रिकांची तपासणी आणि निकालाची प्रक्रीयाही वेळेत पूर्ण केली जाईल म्हणजे विद्यार्थ्यांच्या निकाला उशीर लागणार नाही.

### ४५ लाख विद्यार्थी देणार परीक्षा

साल २०२६ मध्ये सुमारे ४५ लाख विद्यार्थी २०४ विषयाच्या परीक्षा देतील. या परीक्षांना भारतातील विविध राज्याच्या विद्यार्थी बसतील तसेच अन्य देशातील विद्यार्थी देखील परीक्षा देतील. सीबीएसईला मिळालेला जागतिक संपर्क आणि आंतरराष्ट्रीय मान्यता यातून दिसते. बोर्डाने असेही म्हटले आहे की या वेळापत्रकानुसार तयारी करण्यासाठी सर्व विद्यार्थी, शाळा आणि शिक्षकांमध्ये अधिक समन्वय आवश्यक आहे.

### अंदाजित तारखा का जारी केल्या

सीबीएसई बोर्डाने आधी अंदाजित तारखांना जाहीर करण्याचा निर्णय विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सुविधेसाठी घेतला आहे. हे अंदाजित वेळापत्रक २०२५ च्या इयत्ता ९ आणि ११ वीच्या रजिस्ट्रेशन डेटानुसार तयार केले आहे. बोर्डाने म्हटले आहे की यामुळे विद्यार्थ्यांना यामुळे तयारी करायला पुरेसा वेळ मिळेल आणि ते त्यांची तयारी व्यवस्थित करतील आणि अभ्यासाला देखील त्यांना नीट वेळ देता येईल. या पावलाने अनेक फायदे होणार आहेत. विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार करण्याची संधी मिळेल. विषयानुसार नीट वेळ ठरवून अभ्यास करता येईल. शाळा देखील त्यांच्या अकादमीक आणि प्रशासकीय कार्य, उदा. परीक्षा संचालन आणि मुल्यांकनासाठी शिक्षकांची तैनाती योजना आधीच तयार करु शकतील. शिक्षकांना त्यांचे व्यक्तीगत कार्यक्रम आणि सुट्ट्याचे नियोजन करता येईल.

### परीक्षेची अंतिम तारखा केव्हा जारी होणार?

सीबीएसईने स्पष्ट केले आहे की अंतिम तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार आहेत. अंदाजित वेळापत्रकामुळे विद्यार्थी, शाळा आणि शिक्षकांना प्रारंभिक रुपरेषा समजण्यात मदत होत असते. बोर्डाने हे स्पष्ट केले की अंतिम निकाल वेळेवर लागण्यासाठी उत्तर पत्रिका तपासणी आणि इतर प्रक्रियाची योजनाबद्ध संचलन करण्यासाठी हे अंदाजित वेळापत्रक उपयोगी ठरणार आहे.

# संपादकीय

## तोंडाला पुसली पाने!

गत चार-पाच दिवसांपासून मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात ढगफुटीसदृश स्थिती निर्माण झाली असून पावसाने हाहाकार उडवला आहे. सोमवारी रात्री कोसळलेल्या पावसामुळे जनावरे व शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. लोकांच्या घरात पाणी शिरले तसेच उभी पिके वाया गेल्याने शेतक-यांच्या डोळ्यातून अश्रूंचा महापूर वाहू लागला आहे. अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात ८ जणांचा मृत्यू झाला तर १० जण जखमी झाले. धाराशिव येथे हेलिकॉप्टरने २७ जणांना सुखरूपपणे वाचवण्यात आले असून २०० जणांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. पूरग्रस्त भागात एनडीआरएफच्या १७ टीम तैनात असून अतिरिक्त हेलिकॉप्टर मिळावे यासाठी मुख्यमंत्र्यांनी सैन्यदलाशी चर्चा केली आहे. अहिल्यानगर, बीड, परभणी, आदी जिल्ह्यांत ८७५.५ मिमी पाऊस पडला असून सरासरीपेक्षा १०२ मिमी अधिक पाऊस पडला आहे. मराठवाड्यात बीड, परभणी, लातूर आदी जिल्ह्यांना पावसाने झोडपले आहे.

राज्यातील निम्मा खरीप हंगाम पाण्यात आहे. राज्यात पावसाचा कहर सुरूच असून अनेक जिल्ह्यांत पूरस्थितीचा धोका आणखी वाढला आहे. सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला आहे. ओला दुष्काळ जाहीर करा अशी मागणी होत असताना सरकारने मात्र २,२१५ कोटींची मदत जाहीर करून पूरग्रस्तांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. प्रचलित निकषांमध्ये शिथिलता आणून शेतक-यांना मदत दिली जाईल अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. मराठवाड्यात दोन शाळांसह ३१५ हून अधिक घरांची पडझड झाली आहे. दीडशेहून अधिक जनावरांचा मृत्यू झाला आहे. साडेसात हजार गावांपैकी १,१४० गावांमध्ये शेतात पाणी शिरल्याने दोन लाख ५५ हजार १४९ शेतक-यांची दोन लाख २२ हजार १६४ हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. या नुकसानीमुळे तातडीची मदत म्हणून १६०० कोटी रुपयांची मदत प्रशासनाने शासनाकडे मागितली होती.

त्यापैकी ७०० कोटींची मदत देण्यात आली आहे. पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीने थैमान घातले आहे. बुलडाणा आणि यवतमाळ या दोन जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. या विभागात कापूस आणि सोयाबीनची लागवड सर्वाधिक आहे. बंगालच्या उपसागरात तयार होत असलेले कमी दाबाचे क्षेत्र पश्चिमेकडे सरकण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत मराठवाडा, विदर्भातील दक्षिण भागासह मध्य महाराष्ट्र, कोकणात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे सध्या राज्यात पाऊस पडतो आहे. येत्या दोन दिवसांत तो प्रभाव पश्चिमेकडे सरकण्याची शक्यता आहे. पावसाच्या अस्मानी-सुलतानीचा फटका मराठवाड्याला जबरदस्त बसला आहे. हजारो हेक्टरवर उभे असलेले पीक मातीमोल झाले आहे. बीड, धाराशिव, लातूर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावे पुराने वेढली असून नद्या-नाले, ओढे ओसंडून वाहत आहेत. पुराच्या पाण्याने शेतातील माती खरवडून नेली आहे. शेतीला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले आहे परंतु पालकमंत्री अजून त्या जिल्ह्यात पाहणीसाठी गेलेले नाहीत. शेतक-यांच्या पिकांचे पंचनामे झालेले नाहीत. विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यात पिकांचे, जनावरांचे तसेच घरांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. सरकारने स्वत:च्या जाहिरातबाजीवर पैसा उधळण्यापेक्षा आपत्तीग्रस्त शेतक-यांना तातडीची मदत द्यावी. ओल्या दुष्काळाचे निकष बाजूला ठेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतक-यांना १० हजार कोटींची आर्थिक मदत करावी असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. महायुतीचा एकही मंत्री शेतक-यांच्या बांधावर फिरकलेला नाही. मराठवाड्याला सापत्न वागणूक दिली जात आहे. पूरपरिस्थितीची पाहणी करायला मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांना वेळ नाही. नुसते मंत्रालयातल्या आपत्ती व्यवस्थापन कक्षात जाऊन टीव्हीसमोर पाहणी करण्याचे नाटक सुरू आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. २६ सप्टेंबरपासून पुन्हा पाच दिवस पावसाचा जोर वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. शुक्रवारी आणि शनिवारी विदर्भातील सर्व जिल्हे, मराठवाड्यातील सर्व जिल्हे, खान्देश वगळता मध्य महाराष्ट्रातील सर्व जिल्हे आणि कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. कोकणातील सिंधुदुर्ग वगळता मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने 'यलो अलर्ट' दिला आहे. शेतक-यांना मदत करण्यात सरकार कमी पडणार नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्रातील पूरपरिस्थितीवर विस्ताराने चर्चा झाल्याचे सांगून ते म्हणाले, केंद्र सरकारची मदत नक्कीच घेतली जाईल. मात्र, राज्य सरकार त्यासाठी थांबणार नाही. शेतक-यांना तातडीची मदत करणे आवश्यक आहे, ती मदत करणार आहोत असे मुख्यमंत्री म्हणाले. ढगफुटीमुळे संपूर्ण मराठवाडा जलाशयात बुडून गेला आहे. अनेकांना १९९३ मध्ये किल्लारीत झालेल्या भूकंपाची आठवण झाली असेल. त्यावेळी घरेदारेच नव्हे तर जमिनीखाली गाडली गेलेली माणसेच बेपत्ता झाली होती. निसर्गकोपाच्या कायम स्मृतीत असलेला मराठवाडा मात्र राज्य शासनाच्या विस्मृतीत जातो, हे दुर्दैवी आहे. या दुष्काळी भागातील अनेक कर्जबाजारी शेतक-यांनी आत्महत्या केल्या पण सत्तेच्या लोभापोटी नेतेमंडळींनी याकडे दुर्लक्षच केले. शेतीकर्जासाठी अनवाणी पायांनी बँकेच्या दारी जाणारे, ढगफुटीमुळे कर्जात बुडालेले शेतकरी पाहिल्यानंतर यालाच राज्य आणि देशाचा विकास म्हणायचा का असा प्रश्न पडतो. नैसर्गिक आपत्ती म्हणून या संकटाकडे पाहून शेतक-यांना तातडीची आणि दीर्घकालीन मदत दिली पाहिजे. पंचनामे करताना शेतक-यांना विश्वासात घेऊन वास्तव पाहणी केली जावी. यंदाची मदत केवळ पिकांसाठी न राहता जमिनीच्या पुनर्वसनासाठीही असावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. दरम्यान मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आणि पालकमंत्र्यांनी सोलापूर आणि लातूर परिसरात पाहणी केली.

# मराठवाड्यात धो-धो!

महाराष्ट्राला पुन्हा एकदा हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यातील हवामानात मोठे बदल होत असून येत्या दोन दिवसांत अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढणार आहे. नवरात्रोत्सवाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी पावसाने दांडिया नृत्य दाखवले. हवामान खात्याच्या माहितीनुसार २४ तासांत मराठवाड्यात तर २४ ते २७ सप्टेंबरदरम्यान विदर्भात अतिवृष्टी होऊ शकते. २५-२६ सप्टेंबर रोजी चक्रीवादळासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामानात मोठे बदल होऊन पावसाची तीव्रता वाढेल. पावसामुळे सोयाबीन, कापूस, हळद, कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सोलापूर आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये ढगफुटीसदृश पावसामुळे शेती व घरांमध्ये गुडघाभर पाणी साचले. अनेक पिकांचे नुकसान झाले असून शेतक-यांसाठी सरकारकडे तातडीने मदतीची मागणी करण्यात आली आहे. ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्याची मागणी होत आहे.

दरवर्षी सप्टेंबरअखेर मान्सून माघारीचा प्रवास सुरू होतो. मात्र, यंदा हवामानातील बदलांमुळे मान्सूनचा परतीचा प्रवास उशिरा सुरू होईल. ५ ते १० ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातून मान्सून माघार घेण्याची शक्यता असून अजून काही दिवस राज्यात पावसाचे वातावरण कायम राहणार आहे. महाराष्ट्र आणि देशाच्या इतर भागात अजूनही मुसळधार पाऊस सुरू आहे. यंदाची दिवाळी पावसातच साजरी करावी लागणार असे दिसते. नियोजित वेळेआधीच देशात दाखल झालेला मान्सून नियोजित तारखेच्या आधीच परतीचा रस्ता धरेल असा अंदाज आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून १५ ऑक्टोबरपर्यंत भारतातून जाण्याची शक्यता आहे. मान्सूनचा हंगाम दिवाळीपर्यंत राहण्याची शक्यता आहे. राज्यात त्याचे वास्तव्य १० ऑक्टोबरपर्यंत राहील. बंगालच्या उपसागरात २२ सप्टेंबरपासून कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन २४ सप्टेंबरपर्यंत ते अधिक तीव्र होण्याचा अंदाज आहे. परिणामी मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, कोकण किनारपट्टी, मुंबईमध्ये २७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान मुसळधार कोसळू शकतो.

पावसासाठी पोषक असे वातावरण तयार होत असल्याने राज्यात पुन्हा जोरदार सरी बरसण्याची शक्यता आहे. मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राला २५ ते २८ सप्टेंबरदरम्यान अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. सध्या मराठवाड्यासह काही भागात मुसळधार पावसाने कहर केला आहे. मुंबई, पुणे, बीड, धाराशिव, लातूरसह आसपासच्या भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. सध्या संपूर्ण मराठवाडा पाण्याखाली गेला आहे. मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने आणखी एक आठवडा पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे मराठवाड्यातील शेतीचे आणखीन नुकसान होण्याची शक्यता आहे. मान्सून कोसळत असल्याने परतीच्या पावसाबाबत सध्या तरी अंदाज बांधता येत नाही. मराठवाड्यात ब-याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र व विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यात अनेक जिल्ह्यांत मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. विदर्भ व मराठवाड्यातील काही भागात दुपारनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

२७ सप्टेंबर रोजी विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागात पाऊस मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून पुराच्या पाण्याने अनेक गावांना वेढा घातला आहे. दिवसागणिक अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे भयावह वास्तव समोर येत आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका बळिराजाला बसला आहे. खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेले उभे पीक पावसाने मातीमोल केले आहे. बीड जिल्ह्यात २२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री पुन्हा दमदार पावसाने हजेरी लावली. बिंदुसरा नदीने रौद्ररूप धारण केले. पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांना एनडीआरएफच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. पूर परिस्थितीमुळे प्रशासनाने शाळा-महाविद्यालयांना सुटी जाहीर केली. जालना जिल्ह्यातही अतिवृष्टी झाली. अनेक नागरिक पुराच्या पाण्यात अडकले. लातूरमध्येही मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. चौदा प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातही अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. उत्तर सोलापूर, माढा, करमाळा, मोहोळ, बार्शी आणि दक्षिण सोलापूर व तालुक्यातील सर्व शाळांना व महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली. धाराशिव जिल्ह्यातील परंडा, बीडमधील पाटोदा, शिरूर, जालना शहर यासह बहुतांश भागात मुसळधार पावसाने पूरस्थिती निर्माण झाली.

परंडा तालुक्यातील ढगपिंपरी, वडनेर गावातून नागरिकांना बाहेर काढण्यासाठी लष्कराला पाचारण करावे लागले. २७ जणांना बाहेर काढण्यात आले तर आणखी १५० जण अडकले आहेत. भूम तालुक्यातील १४ जणांना हेलिकॉप्टरद्वारे पुराच्या पाण्यातून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला. बार्शी, माढा, माळशिरस, पंढरपूर, अक्कलकोट या ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. लातूरच्या मांजरा नदीमुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. मांजरा धरणाचे आठ दरवाजे उघडल्याने नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत आहे. लातूर जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले. सातत्याने अतिवृष्टी, ढगफुटीसदृश पाऊस पडत असल्याने नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. शेत शिवारात पाणी साचून राहिल्याने पिके हातातून गेल्यात जमा आहेत. औसा तालुक्यात भादा, भेटा तर निलंगा तालुक्यात औराद शहाजनी येथे ढगफुटीसदृश पाऊस झाला. पुरामुळे रस्ते बंद झाले, शेतातील माती खरवडून गेली. जवळा (बु.) परिसरातही ढगफुटीसदृश पाऊस झाला. बहुतेक ठिकाणी पुरामुळे शेतशिवारासह नदी, ओढ्याकाठच्या गावांत पाणी शिरले. खरीप पिके भुईसपाट झाली. एकंदरीत पावसाने मराठवाड्यात अक्षरश: धुमाकूळ घातला आहे.

# बचत उत्सव सुरू!

यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जीएसटी जनरेशन २.०'ची घोषणा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी सोमवारपासून (२२ सप्टेंबर) सुरू झाली. 'जीएसटी २.०'च्या अंमलबजावणीच्या पूर्वसंध्येला रविवारी पंतप्रधान मोदींनी देशाला संबोधित केले. सोमवारपासून 'जीएसटी बचत उत्सव' सुरू होणार असून त्याचा फायदा सर्वांना होईल तसेच नागरिकांनी स्वदेशी वस्तूंचा आग्रह धरावा, असे आवाहनही त्यांनी केले. २० मिनिटांच्या भाषणात त्यांनी जीएसटी सुधारणा, आत्मनिर्भर भारत व स्वदेशीवर भर दिला. स्वदेशी मोहिमेबरोबरच उत्पादनावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी राज्य सरकारला केले. गुंतवणुकीसाठी सुयोग्य परिस्थिती बनवावी. केंद्र व राज्य सरकारने यासाठी पुढाकार घेतल्यास देशात प्रगतीचे स्वप्न साकार होईल, असेही मोदी म्हणाले. पुढे ते म्हणाले, देश नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी 'स्वावलंबी भारत' मोठे पाऊल उचलत आहे. २२ सप्टेंबरच्या सूर्योदयाबरोबरच 'नेक्स्ट जनरेशन जीएसटी' लागू केले जाईल त्यामुळे देशात 'जीएसटी बचत उत्सव' सुरू होणार आहे

त्यामुळे तुमची बचत वाढणार असून तुम्ही तुमच्या आवडीच्या वस्तू खरेदी करू शकता, असे त्यांनी सांगितले. २०१४ मध्ये देशाने मला पंतप्रधान बनवले तेव्हा लाखो कंपन्या वेगवेगळ्या करामुळे त्रस्त होत्या. एका शहरातून दुस-या शहरात प्रवासात खर्च वाढत होता. या जंजाळातून देशाला बाहेर काढणे गरजेचे होते त्यामुळे आम्ही जीएसटीला प्राधान्य दिले. आम्ही सर्व भागधारक व राज्यांशी चर्चा करून तोडगा काढला. त्यातून 'एक देश-एक कर' अस्तित्वात आला, असे मोदी म्हणाले. गत ११ वर्षात २५ कोटी जणांनी गरिबीवर मात केली आहे. गरिबीतून बाहेर आलेले लोक आता मध्यमवर्गीय म्हणून जगत आहेत. यंदा सरकारने १२ लाख रुपये प्राप्तीकर माफी दिली त्यामुळे मध्यमवर्गीयांच्या जीवनात खूप बदल झाला. जीएसटी कमी झाल्याने घरबांधणी, टीव्ही, फ्रिज, दुचाकीसाठी कमी खर्च लागेल, असे मोदी म्हणाले. 'विकसित व स्वावलंबी' भारताचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी एमएसएमई क्षेत्रावर मोठी जबाबदारी आहे. ही देशाच्या जनतेची गरज आहे. ज्या वस्तू आपण देशात बनवू शकतो त्या येथेच बनवल्या पाहिजेत.

जीएसटी दर कमी झाल्याने, नियम आणि प्रक्रिया सोपी केल्याने एमएसएमईला मोठा फायदा होईल. त्यांची विक्री वाढेल व कर कमी द्यावा लागेल त्यामुळे त्यांना दुप्पट फायदा होईल. भारत जेव्हा प्रगतीच्या शिखरावर होता तेव्हा त्याचा आधार एमएसएमई होते. भारतात त्या काळी बनणा-या वस्तूंचा दर्जा चांगला होता. आता ते दिवस आपल्याला पुन्हा आणायचे आहेत. भारताच्या वस्तू जगात सर्वोत्कृष्ट असल्या पाहिजेत, असे मोदी म्हणाले. सर्व राज्यांनी स्वदेशीबरोबरच उत्पादन क्षेत्राला गती दिली पाहिजे. गुंतवणुकीसाठी अनुकूल परिस्थिती बनवायला हवी. देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला स्वदेशी मंत्राने ताकद मिळाली. आता देशाची समृद्धी स्वदेशीतून निर्माण होईल, असे पंतप्रधान म्हणाले. दैनंदिन जीवनातील परदेशी वस्तूंपासून आपल्याला मुक्ती मिळवायची आहे त्यामुळे भारतात बनलेल्या वस्तू खरेदी करायला हव्यात. प्रत्येक दुकान हे स्वदेशीने सजवायचे आहे. 'अभिमानाने सांगा, मी स्वदेशी वस्तू वापरतो आणि विकतो' हे प्रत्येक भारतीयाने ठामपणे सांगितले पाहिजे.

प्राप्तीकर व जीएसटी सवलत पाहता देशातील जनतेची अडीच लाख कोटी रुपयांची बचत होणार आहे, असे मोदी म्हणाले. 'जीएसटी'चे या पूर्वीचे ५ टप्पे रद्द करण्यात आले आहेत. आता 'जीएसटी'चे फक्त ५, १८ व ४० टक्के हे ३ टप्पे राहणार आहेत. 'जीएसटी'तील दुरूस्तीचे श्रेय पंतप्रधान मोदी हे स्वत:कडे घेत आहेत, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केली आहे. 'जीएसटी'तील सध्याच्या सुधारणा अपु-या असून राज्यांची नुकसान भरपाईची मागणी मान्य केलेली नाही. जनतेला खोल जखमा करून त्यावर बँडेज लावण्याचा हा प्रयत्न आहे, असे खरगे म्हणाले. गत ८ वर्षात तुम्ही जनतेकडून ५५ लाख कोटी रुपये उकळले. आता २.५ लाख कोटींच्या बचतीच्या गप्पा मारता, असा टोलाही खरगे यांनी लगावला. 'जीएसटी'त सुधारणा केल्याने सर्वसामान्य मध्यमवर्गीय ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. अनेक रोजच्या वापराच्या वस्तूंवरील कर आता १२ किंवा १८ टक्क्यावरून थेट ५ टक्के करण्यात आला आहे. साबण, शॅम्पू, टुथपेस्ट यासारख्या वस्तूंवर ५ टक्के कर राहील. दूध, डाळी, भाजीपाला यासारख्या जीवनावश्यक अन्नपदार्थावरील कर शून्य करण्यात आला आहे.

टीव्ही, फ्रिज, एसी यावरील जीएसटी २८ वरून १८ टक्के करण्यात आला आहे त्यामुळे इलेक्ट्रॉनिक बाजाराला चालना मिळेल. घरबांधणी व शेती क्षेत्रालाही या सुधारणेचा थेट फायदा होणार आहे. सिमेंटवरील कर २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला असून मार्बल, ग्रॅनाइट, विटा-ब्लॉक्ससारख्या वस्तूंवरील कर १२ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. शेतीसाठी ट्रॅक्टर व अवजारांवरील कर १२ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. खते, बियाणे यावरील जीएसटीही कमी करण्यात आला आहे. दरकपातीमुळे उत्पादने स्वस्त होऊन मागणी वाढेल. ग्रामीण व शहरी बाजारात खरेदीशक्ती वाढून जीएसटी सुधारणेचा प्रत्यक्ष फायदा ग्राहकांना मिळेल. ग्राहकांच्या खिशात बचत झालेल्या पैशांमुळे ही बचत इतर खरेदीकडे वळेल आणि एकंदर अर्थव्यवस्थेत खर्च वाढीस लागेल. करकपातीचा मध्यमवर्गीय ग्राहकांना मोठा फायदा होईल. आवश्यक वस्तू स्वस्त झाल्याने घरगुती बजेटवरील ताण कमी होईल. सरकारच्या मते या दरकपातीमुळे वर्षाला ४८ हजार कोटीचे करसंकलन कमी होईल; पण त्या बदल्यात बाजारात मागणी वाढून अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

अर्थतज्ज्ञांच्या मते किरकोळ महागाई ०.५ ते १.१ टक्क्यांपर्यंत घटू शकते. करकपात सर्वसामान्यांसाठी फायदेशीर असली तरी काही उद्योग आणि ग्राहकवर्गाला त्याचा तोटा जाणवणार आहे. जीएसटी वाढल्यामुळे महागड्या वस्तू खरेदी करणा-यांच्या खिशावर अधिक भार पडेल. ४० टक्के स्लॅबअंतर्गत तंबाखू पदार्थ, पान मसाला, सुगंधी सुपारी, कार्बोनेटेड शीतपेये, मोठ्या लक्झरी गाड्यांच्या किमती वाढणार आहेत. कोळशावरील कर ५ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आल्याने वीज उत्पादन खर्च वाढून वीज दरवाढीचा धोका आहे. करकपातीमुळे औषधांच्या किमती कमी होतील. उपचार, आरोग्य सेवा स्वस्त झाल्याने लोकांच्या वैद्यकीय खर्चाची बचत होईल. आगामी काळात जीएसटी व्यवस्थेत आणखी तांत्रिक सुधारणा, डिजिटल सुलभता आणि करप्रणालीचे स्थैर्य याकडे सरकारला लक्ष द्यावे लागेल.

Marathi News paper 'Puneri Chalval' Editor ,Owner Sunil Balkisan Goyal Printed at Shree Samarth Printers, 483, Roshani Palace, Shop No 8, Shaniwar Peth, Dist - Pune - 411030 and Published by Varun Sunil Goyal from S. No-155,HussinShah Baba Nagar vishrantwadi Pune 411006 Editor -Sunil Balkisan Goyal

पुणेरी चळवळ हे मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक – सुनिल बालकिसन गोयल एवं प्रकाशक – वरुण सुनिल गोयलने श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस, शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा–पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) मुद्रीत कर शहर कार्यालय सं.नं.१५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया के बाजुमें येरवडा पुणे – ४११००६ ( महाराष्ट्र ) यहाँ प्रकाशित किया. संपादक– सुनिल बालकिसन गोयल

पुणेरी चळवळ मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक– सुनिल बालकिसन गोयल तसेच प्रकाशक – वरुण सुनिल गोयल यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस , शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा–पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापुन शहर कार्यालय सं. नं. १५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया शेजारी येरवडा पुणे – ४११००६ ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक– सुनिल बालकिसन गोयल
अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या, लेख, व जाहीरात यांच्याशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही. सदरचा वाद–विवाद पुणे न्यायलयाच्या कक्षेत

# जुगाराच्या नादाने उच्चशिक्षित चोरवाटेवर!

■ **खासगी विद्यापीठाची अडीच कोटीची फसवणूक; हैदराबादमधून अटक**

**पुणे :** शहरातील एका नामांकित खासगी विद्यापीठाची अडीच कोटी रुपयांची ऑनलाइन फसवूणक करणाऱ्या उच्चशिक्षित चोरट्याला पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने अटक केली. आरोपी तरुणाने पीएचडी प्राप्त केली असून, केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा तो उत्तीर्ण झाला होता. ऑनलाइन जुगाराच्या नादामुळे त्याने सायबर फसवणुकीचे गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले.

सितैया किलारू (वय ३४, रा. हैदराबाद) असे अटक करण्यात आलेल्या सायबर चोरट्याचे नाव आहे. सितैया याने लंडनध्ये शिक्षण घेतले आहे. शहरातील एका नामांकित खासगी विद्यापीठातील शैक्षणिक अधिकाऱ्याला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंच्या नावे जुलै महिन्यात संदेश पाठविण्यात आला. त्यात मुंबईतील आयआयटीतील एका प्राध्यापकाचा क्रमांक देण्यात आला होता.

'शासनाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि ड्रोन संशोधन प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर निधी देण्यात येणार आहे. निधी मंजुरीसाठी सुरुवातीला दोन टक्के रक्कम भरावी लागेल,' अशी बतावणी सितैयाने बनावट संदेशात केली होती.

संबंधित नामांकित विद्यापीठातील अधिकाऱ्याने दोन कोटी ४६ लाख रुपये आरोपी सितैया याच्या खात्यात ऑनलाइन पद्धतीने जमा केले. निधी मंजूर करारासाठी त्याला बोलाविण्यात आले. मात्र, तो तेथे गेला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर याबाबत पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. त्यानंतर सायबर गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास सुरू केला.

विद्यापीठाकडून घेतलेली रक्कम आरोपी सितैयाने स्वत:च्या खात्यात जमा करून घेतली होती. तांत्रिक तपासात ही बाब उघडकीस आल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे आणि पथकाने तपास करून त्याला पकडले.

गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त विवेक मासाळ, राजलक्ष्मी शिवणकर, सहायक आयुक्त मच्छिंद्र खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संगीता देवकाते, पोलीस कर्मचारी संदीप मुंढे, बाळासाहेब चव्हाण, नवनाथ कोंडे, संदीप कारकूड, टिना कांबळे, अमोल कदम, सचिन शिंदे, सुप्रिया होळकर आदींनी ही कामगिरी केली.

आरोपी सितैया मूळचा विजयवाडा येथील आहे. २०१० मध्ये त्याने अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले. २०१० ते २०१४ या कालावधीत त्याने लंडनमधील एका नामांकित विद्यापीठातून उच्च शिक्षण पूर्ण केले. नंतर त्याने पीएचडी मिळविली. २०१५ मध्ये हैदराबादमधील एका विद्यापीठात त्याने नोकरी केली.

# '१९६२च्या युद्धात वायुदलाचा वापर झाला असता तर

**पुणे :** 'रिव्हेली टू रिट्रीट' हे पुस्तक केवळ आत्मचरित्र नाही, तर ते नेतृत्व, धोरण आणि सेवाभावाचे चिंतन आहे. हे पुस्तक भूतकाळातील निर्णयांचा अभ्यास, त्यांचे प्रामाणिक मूल्यमापन करतानाच पुढील पिढ्यांसाठी शिकवणही देते,' असे मत संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी व्यक्त केले.

'पूर्वीच्या काळात हवाई दलाचा वापर तणाव वाढवणारा असल्याचे मानले गेले. मात्र, आज तशी परिस्थिती राहिलेली नाही, हे 'ऑपरेशन सिंदूर'मधून दिसून येते,' असेही चौहान यांनी सांगितले. 'थोरात यांनी केवळ भारतातच नाही, तर परदेशातही काम केले. कोरियन युद्धानंतर कस्टोडियन फोर्सचे नेतृत्व केले. कोरिया आजजगातील सर्वाधिक संवेदनशील ठिकाणांपैकी एक आहे. आता तर उत्तर कोरिया अण्वस्त्रधारी देश झाल्याने धोका अधिकच वाढला आहे. भौगोलिक आणि भूराजकीय परिस्थिती बदलल्याने थोरात यांच्या 'फॉरवर्ड पॉलिसी'चे आज विश्लेषण करणे कठीण आहे. मात्र, लडाख आणि नेफा येथे समान पद्धतीने 'फॉरवर्ड पॉलिसी' लागू करणे चुकीचे ठरले,' असे चौहान म्हणाले. 'थोरात हे भारतीय सैन्याच्या उत्तम परंपरेचे उदाहरण होते. स्वातंत्र्यापूर्वीचे भारतीय सैन्य आणि नव्याने निर्माण होणारे स्वतंत्र भारताचे सैन्य या दोन पिढ्यांतील ते दुवा होते. स्वतंत्र भारताचे सैन्य उभारणे हे दूरदृष्टी आणि जुळवून घेण्याच्या क्षमतेची कसोटी पाहणारे होते. १९५७ पासूनच चीनकडून येणाऱ्या संकटाचा त्यांना अंदाज असल्याने त्यांनी १९६०मध्ये युद्धसराव केले. चीनकडून हल्ला होण्याचा त्यांचा इशारा अचूक ठरला. जवानांची काळजी घेणे, त्यांचे कल्याण, प्रशिक्षण आणि मनोबल उंचावणे हाच अधिकाऱ्याचा प्रमुख धर्म आहे. त्यांच्या जीवनातून दूरदृष्टी आणि नैतिक बळ याचे महत्त्व कळते. त्यामुळे थोरात यांचे अनेक वर्षे उपलब्ध नसलेले पुस्तक पुन्हा उपलब्ध होत आहे, ही महत्त्वाची बाब आहे. त्यांचे आत्मचरित्र हे केवळ एका सैनिकाचे जीवनचरित्र नाही, तर नेतृत्वाचा धडा आहे,' असे लेफ्टनंट जनरल सेठ यांनी नमूद केले. तर '१९६२च्या युद्धाची सावली भविष्यातील सैन्यविकास, क्षमतावर्धन आणि सामर्थ्यनिर्मितीची प्रेरणा ठरली. गेल्या १५-२० वर्षांत उत्तरेकडील शत्रू पुरेसा परावृत्त झाला आहे. पूर्वी आखलेल्या योजनांचा पाया आज अधिक मजबूत होत आहे,' असे अनिंद्य सेनगुप्ता यांनी सांगितले. '१९६२मध्ये हवाई दलाचा वापर झाला असता, तर चिनी आक्रमणाचा वेग मंदावला असता, कदाचित थांबवलाही गेला असता. त्या वेळी भौगोलिक परिस्थिती भारतासाठी अनुकूल होती,' असे जनरल चौहान यांनी नमूद केले.

# गांजा विक्री करणारा तरुण गजाआड

**पुणे :** वानवडी भागात गांजा विक्री करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली. तरुणाकडून गांजा, दुचाकी, मोबाइल संच असा ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तौफिक रझाक शेख (वय २६, रा. नवाजीश चौकाजवळ, मीठानगर, कोंढवा खुर्द) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. वानवडीतील गंगा सॅटेलाईट सोसायटी ते नेताजीनगर रस्त्यावर हा प्रकार घडला. वानवडी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी विठ्ठल चोरमोले, अमोल गायकवाड हे गस्त घालत होते. शेख दुचाकीवरुन तेथे गांजा विक्रीसाठी आला होता. याबाबतची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून शेखला पकडले. पोलिसांनी त्याच्याकडील पिशवीची तपासणी केली. तेव्हा पिशवीत ८१० ग्रॅम गांजा सापडला. त्याच्याकडून गांजा, दुचाकी, मोबाइल संच असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शेखने गांजा कोणाकडून आणला, तसेच तो गांजाची विक्री कोणाला करणार होता, यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार डोके, सहायक निरीक्षक उमाकांत महाडिक, दया शेगर, महेश गाढवे, अमोल पिलाणे, अतुल गायकवाड, विठ्ठल चोरमोले, विष्णू सुतार, अमोल गायकवाड यांनी ही कामगिरी केली. गुटख्याची विक्री करणाऱ्या एकाला खडक पोलिसांनी अटक केली. मनीष कांतिलाल गेहलोत (वय २०, रा. डाके चौक, सुखसागरनगर, कात्रज) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई आशिष चव्हाण यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार पेठेतील गाडीखाना चौकात एका दुकानासमोर गेहलोत गुटखा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती खडक पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसंनी सापळा लावून त्याला पकडले.

## नवरात्रोत्सवात पादचारी महिलेचे दागिने हिसकावले

**पुणे :** नवरात्रोत्सवात महिलांकडील दागिने हिसकावण्याचे सत्र सुरू आहे. कोथरूड भागात पादचारी महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. याबाबत एका महिलेने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोथरूड भागातील शास्त्रीनगर परिसरात राहायला आहे. बुधवारी (२४ सप्टेंबर) सायंकाळी सहाच्या सुमारास महिला महात्मा सोसायटी परिसरातून निघाली होती. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेले. महिलेने आरडाओरडा केला. चोरटे भरधाव वेगात दुचाकीवरुन पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त भाऊसाहेब पटारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत असून, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी चित्रीकरण ताब्यात घेतले आहे. पोलीस उपनिरीक्षक चव्हाण तपास करत आहेत. बालेवाडी भागात दोन दिवसांपूर्वी पादचारी महिलेकडील दागिने दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेले होते. शहर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून पादचारी महिलांकडील दागिने हिसकावून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# लोकअदालतीमध्ये पाणीपट्टी, मालमत्ता कराची पाच कोटींची थकबाकी वसूल

**पिंपरी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणद्वारे घेण्यात आलेल्या लोकअदालतीत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपट्टी आणि मालमत्ता कराची पाच कोटींची थकबाकी वसूल झाली आहे. तीन हजार ४२४ प्रकरणे निकाली निघाली आहेत.

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत पाणीपट्टी व मालमत्ता कर थकबाकीदारांना ऑनलाइन नोटिसा पाठवल्या होत्या. लोकअदालतीमध्ये पाणीपट्टी आणि मालमत्ता कराशी संबंधित तीन हजार ४२४ प्रकरणे निकाली निघाली. पाच कोटी १४ लाख १६० रुपयांचा महसूल संकलित झाला आहे. या लोकअदालतीकरिता नोटिसा पाठवलेल्या मालमत्ताधारकांनी थकबाकीसह चालू वर्षाचा मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात मालमत्ता कराचा भरणा केला आहे, त्यांना चालू वर्षाच्या सामान्य करावरील चार टक्के सवलतीचा लाभ मिळाला आहे.

दोन हजार ४८१ पाणीपट्टी थकबाकीदारांकडून तीन कोटी १४ लाख १९ हजार रुपयांची पाणीपट्टी वसूल झाली. ९४३ मालमत्ता कर थकबाकीदारांकडून दोन कोटी २ हजार रुपयांचा मालमत्ता कर संकलित झाला आहे. यामध्ये ८३४ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात मालमत्ता कर भरून चार टक्के सवलतीचा लाभ घेतल्याचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले. लोकअदालतीत मालमत्ता कराची मोठ्या प्रमाणावर थकबाकी वसूल झाली. या पुढेही प्रत्येक थकबाकीदारापर्यंत पोहोचण्यासाठी अधिक प्रभावी मोहिमा राबवणार आहोत. तसेच वारंवार संधी देऊनही थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी सांगितले.

## पदवी प्रमाणपत्रे आता अधिक सुरक्षित

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पदवी प्रमाणपत्रे आता अधिक सुरक्षित होणार आहे. विद्यापीठाने गुणपत्रक, प्रमाणपत्रांच्या छपाईची मुद्रणपूर्व सामग्री आता नाशिकच्या भारतीय सुरक्षा छापखान्याकडून (इंडियन सिक्युरिटी प्रेस) खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून, विद्यापीठाच्या प्रमाणपत्रांना अतिरिक्त सुरक्षा वैशिष्ट्ये प्राप्त होणार आहे. भारतीय सुरक्षा छापखाना ही जगात सर्वात सुरक्षित मानल्या जाणाऱ्या छापखान्यांपैकी एक आहे. भारतासह अनेक देशातील पारपत्र, १० रुपयांपासून ५० हजारापर्यंतचे मुद्रांक, महसूल विभागाचे मुद्रांक, लष्करी आस्थापनांची ओळखपत्रे, विद्यापीठे, केंद्रीय विद्यालयांची गुणपत्रके अशी छपाईची कामे नाशिकच्या छापखान्यात होतात. या पार्श्वभूमीवर, विद्यापीठाची प्रमाणपत्रे सुरक्षित, गोपनीय पद्धतीने करण्याच्या दृष्टीने कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या अध्यक्षतेखाली कुलसचिव प्रा. ज्योती भाकरे, परीक्षा संचालक डॉ. प्रभाकर देसाई, अधिष्ठाता डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. संदेश जाडकर, डॉ. विजय खरे, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. संजय तांबट, डॉ. चारुशीला गायके यांच्या समितीने ही खरेदी प्रक्रिया राबवण्याच्या दृष्टीने भारतीय सुरक्षा छापखान्याला भेट देऊन अधिकाऱ्यांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. त्यानंतर अहवाल सादर केला. त्यानुसार सुरक्षा मानके, कागदाचा नमूना, गोपनीयता आणि विश्वासार्हता या अनुषंगाने मुद्रणपूर्व साधनसामग्री भारतीय सुरक्षा छापखान्यातून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद आणि खरेदी समितीने मंजुरी दिली आहे.

# शहरातील २५५ रिक्षा थांबे कमी करण्याचा आरटीओचा निर्णय

**पुणे :** शहरातील मंदावलेली वाहूतक आणि ठिकठिकाणी होणारी कोंडी सोडविण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) शहरातील २५५ रिक्षा थांबे कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या शहरात एक लाख ४५ हजार रिक्षा असून, त्यांच्यासाठी ६९५ थांबे निश्चित केले आहेत. शहरात वाहतुकीला अडथळे ठरणारे अतिक्रमण, बांधकामे आणि इतर कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार पुणे आरटीओ, वाहतूक पोलीस आणि पुणे महापालिका यांच्या वतीने नुकतेच रिक्षा थांब्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये रिक्षा थांब्याचे ठिकाण निश्चित करण्यासाठी ४१ पोलीस ठाण्यांच्या हद्दीचा विचार करण्यात आला असून, केवळ ६९५ थांबे निश्चित करण्यात आले. उर्वरित २५५ स्थानके रद्द करून या अहवालाला प्रादेशिक परिवहन समितीने मंजुरी दिली. परिवहन विभागाच्या २०१५ पूर्वी रिक्षांची संख्या एक लाखाच्या आत असताना ९५० थांबे मंजूर केले होते. हळूहळू रिक्षांच्या संख्येत वाढ झाली आहे. सध्या शहरात एक लाख ४५ हजारांपेक्षा अधिक रिक्षा असताना आरटीओने २५५ रिक्षा थांबे रद्द केले आहेत.

# अर्ध्या महाराष्ट्राला अतिवृष्टी व पुराचा फटका

■ **मदतीसाठी लवकरच योजना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही खासगी उद्योगांना सीएसआरमधून मदत करण्याचे आवाहन**

**मुंबई :** राज्याच्या जवळपास अर्ध्या भागाला अतिवृष्टी व पुराचा फटका बसला असून संकटात सापडलेल्या शेतक-यांच्या मदतीसाठी, कष्टाने उभारलेले त्यांचे संसार पुन्हा सावरण्यासाठी सरकारकडून भरीव मदत दिली जाईल. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री पूरग्रस्त भागातील दौ-यावरून परतल्यानंतर याबाबतची योजना नक्की केली जाईल अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली.

मुंबईत पत्रकारांशी बोलताना बावनकुळे यांनी, राज्याचा जवळपास अर्धा भाग पूरग्रस्त झाला असून पूरग्रस्त कुटुंब व शेतक-यांना तातडीने मदत देण्यासाठी सरकार तत्पर आहे. ती सुरूही झाली आहे. संपूर्ण मंत्रिमंडळ पूरग्रस्त भागातील पाहणीसाठी गेले आहे. मदतीसाठी सगळेच तयार आहेत. महसूल अधिका-यांना अचूक पंचनामे करण्याचे आदेश आपण दिले आहेत.

बडे उद्योजक व कंपन्यांनी आपल्या सीएसआर फंडातून पूरग्रस्त शेतक-यांना मदत करण्याचे आवाहन आपण केले आहे. राज्यामध्ये पूर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री सध्या शेतक-यांच्या बांधावर पोहचले आहेत. दर तासाने मीदेखील राज्याचा आढावा घेत आहे. महसूल यंत्रणेतील सर्वांशी बोलत आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये सध्या मोठे नुकसान झाले असून शेतजमीन खरडून गेली आहे.

शेतकरी टाहो फोडत आहेत. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये यासाठी त्यांचे पंचनामे होणे आवश्यक आहे. महसूल यंत्रणेने संपूर्ण ताकदीनिशी शेतक-यांच्यामागे उभे राहावे. राज्यात एखादी नवीन योजना किंवा रस्त्याची कामे मागी राहिली तर चालतील पण शेतक-यांना तातडीने मदत देऊ. शेतकरी हतबल होऊ नये यासाठी सरकार पुरेपूर काळजी घेईल असे सांगितले.

### त्यांचे संसार पुन्हा उभे करू

मराठवाड्यात हाताला आलेले पीक नाहीसे झाल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. पण, त्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. सरकार पूर्णपणे शेतक-यांच्या पाठिशी आहे. शेतक-यांबाबत सरकारला आत्मीयता असून त्यांचे मोडलेले संसार पुन्हा उभे करून देण्याचे काम केले जाईल. त्यासाठी गावक-यांनी देखील अधिका-यांनी पंचनाम्यासाठी मदत करावी.

# गुंतवणुकीच्या आमिषाने एक कोटी ९२ लाखांची फसवणूक

■ **विमानतळ पोलिसांकडून एकाला अटक**

**पुणे :** गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने एक कोटी ९२ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी एकाला अटक केली.

सचिन विलास कांबळे (वय ४२, रा. अमृत बंगला, थेरगाव, पिंपरी-चिंचवड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका व्यावसायिकाने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कांबळे आणि तक्रारदार व्यावासायिकाची गेल्या वर्षी ओळख झाली होती. कांबळे याने लोहगाव परिसरात खासगी कार्यालय सुरु केले होते. तक्रारदार व्यावसायिक लोहगाव भागात राहायला आहे.

आरोपीने व्यावसायिकाला गुंतवणुकीवर सात टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविले होते. व्यावसायिकाने सुरुवातीला ३३ लाख ८० हजार रुपये गुंतविले. तक्रारदार आणि परिचितांनी कांबळे याच्याकडे एकूण मिळून एक कोटी ९२ लाख ९५ हजार रुपये गुंतवणुकीस दिले. रक्कम गुंतविल्यानंतर त्यांना सुरुवातीला परताव्यापोटी काही रक्कम देण्यात आली. त्यानंतर कांबळेने त्यांना परताावा देणे बंद केले. परताव्याबाबत विचारणा केल्यानंतर कांबळेने टाळाटाळ सुरू केली.फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर विमानतळ पोलीस ठाण्यात गुंतवणुकदारांनी तक्रार अर्ज दिला. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शरद शेळके तपास करत आहेत.

शेअरमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने ५२ लाखांची फसवणूक

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने दोघांची ५२ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी वाघोली आणि कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. याबाबत एका तरुणाने वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण समाज माध्यमातील जाहिरात पाहत होता. त्यावेळी शेअर बाजारातील गुंतवणूक विषयक जाहीरात त्याने पाहिले. या जाहिरातीतील लिंक उघडल्यानंतर चोरट्यांनी त्यांना शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखविले. चोरट्यांनी तरुणाला समाज माध्यमातील एका समुहात सहभागी करुन घेतले.

तरुणाने सुरुवातीला काही रक्कम गुंतविली. गुंतवणुकीवर परतावा मिळाल्याचे चोरट्यांनी भासविले. तरुणाने चोरट्यांच्या खात्यात ऑनलाइन पद्धतीने ३७ लाख ८४ हजार रुपये गुंतविले. गुंतवणूक केल्यानंतर त्याला प्रत्यक्ष परतावा दिला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक बागल तपास करत आहेत. कोंढवा भागातील एका महिलेची शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी १४ लाख ६९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध कोंडवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख तपास करत आहेत.

# केंद्र सरकारच्या ग्रंथ प्रदर्शनात केवळ हिंदुत्ववादी विचारसरणी, गोळवलकर गुरुजींचे! शरद पवारांचे वक्तव्य

**पुणे :** केंद्र सरकारच्या सहकार्याने अलीकडे ग्रंथ प्रदर्शने भरविली जातात. उत्सुकता म्हणून मी देखील या ग्रंथ प्रदर्शनाला भेट दिली तेव्हा प्रकर्षाने असे जाणवले की या ग्रंथ प्रदर्शनामध्ये हिंदुत्ववादी विचारसरणी, गोळवलकर गुरुजींचे साहित्य प्राधान्याने दिसते. मात्र, आंबेडकरवादी किंवा समतावादी चळवळीतल्या साहित्याला त्या ठिकाणी स्थान नसते, ही खेदाची गोष्ट आहे, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली.

माजी आमदार जयदेव गायकवाड यांच्या पुढाकारातून स्थापन करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल रिसर्च सेंटरचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले. सत्यशोधक समाज स्थापना दिनाचे औचित्य साधून बालगंधर्व रंगमंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ज्येष्ठ विचारवंत बाबा आढाव, खासदार निलेश लंके, माजी आमदार उल्हास पवार, ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, राजकीय अभ्यासक डॉ. सुहास पळशीकर, ड शारदा वाडेकर, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, लक्ष्मण माने, आदी उपस्थित होते. 'भारतीय संविधान: संसदीय लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर झालेल्या परिसंवादात मान्यवरांनी विचार मांडले.

पवार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सामाजिक संशोधन केंद्राचे उद्घाटन होतेय, ही सकारात्मक गोष्ट आहे. देशात काही चुकीच्या गोष्टी घडत आहेत, पण तरीही संविधानाचा पाया भक्कम असल्याने संसदीय साधनांचा आधार घेऊन भूमिका मांडण्याचा अधिकार आपल्याला आहे. याच संविधानामुळे भारत एकसंध आहे.

देशापुढील आव्हाने हळूहळू गंभीर होत आहे. अनेक विचारांचे, भूमिकांचे लोक संसदेत आहेत. कधीकधी चिंता वाटावी, असे चित्र दिसते. निर्णय घेण्याचे व्यासपीठ बाजूला ठेवून निर्णय घेतले जातात. परंतु, संविधानाच्या चौकटीबाहेर जाता येत नसल्याने अनेकदा त्यांचा भ्रमनिरास होतो. देशातील प्रत्येक समस्येवर संविधानात उत्तर आहे.

भारताच्या शेजारील पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश या देशांमध्ये अस्थिरतेचे वातावरण आहे. अशावेळी भारत मात्र एकसंध व प्रगतीच्या पथावर आहे.

# 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांद्वारे अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न - रुपाली चाकणकर

**नागपूर :** लग्नसंस्था ही आपल्या भारतीय समाजाचा पाया आहे. ती टिकवण्यासाठी घटस्फोटांच्या वाढत्या प्रमाणावर गंभीरपणे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे लग्नानंतर वाद झाल्यास होणाऱ्या समुपदेशनाबरोबरच लग्नाच्याआधी, तरुण वर्गाचे विवाहपूर्व समुपदेशन यावर भर देणे आवश्यक आहे. येत्या काळात राज्य महिला आयोग विवाहपूर्व समुपदेशन केंद्राबाबत अग्रक्रमाने काम करणार असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी आज येथे सांगितले



राज्य महिला आयोगाच्या वतीने 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत महिलांच्या समस्या व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव ड. प्रवीण उन्हाळे, महिला व बालविकास विभागीय उपायुक्त दत्तात्रय मुंडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे यांच्यासह संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, समुपदेशक, तक्रारदार, पॅनलमध्ये समाविष्ट विधीतज्ञ, पोलीस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# बारामतीत भगरीच्या पिठातून विषबाधा

**बारामती :** बारामती तालुक्यातील झारगडवाडी गावात भगरीच्या पिठातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, या घटनेत चार महिलांना त्रास झाल्याने उपचार सुरू आहेत. त्यामुळे गावात आणि परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

नवरात्रोत्सवात उपवासाच्या दिवसांत महिलांकडून मोठ्या प्रमाणात भगरीच्या पिठाच्या भाकऱ्या बनवल्या जातात. झारगडवाडीतही काही कुटुंबांनी किराणा दुकानातून आणलेल्या भगरीच्या पिठापासून भाकऱ्या केल्या. मात्र त्या खाल्ल्यानंतर काही महिलांना अचानक उलटी, मळमळ व अशक्तपणा जाणवू लागला. प्राथमिक उपचारासाठी डोर्लेवाडी येथील आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलेल्या दोन महिलांची प्रकृती बरी असून, उर्वरित दोन महिलांवर बारामती मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पंचायत समितीचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज खोमणे यांनी तातडीने गावात तिन्ही पथकांसह सर्वेक्षण केले.

गावातील संबंधित किराणा दुकानावर कारवाई करण्यात आली असून शिल्लक भगरीचे पीठ सील करण्यात आले आहे. तसेच विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. रात्री उशिरा अन्न व औषध प्रशासन विभागानेही तपासणी करून पुढील कारवाई सुरू केली आहे.

# शालेय उपक्रमात सर्वोत्तम काम असलेल्या जिल्ह्यांना मिळणार ५, ३ व २ कोटींची पारितोषिके

■ **शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची घोषणा**

**पुणे :** राज्यातील गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद व महानगरपालिकांना अनुक्रमे प्रथम क्रमांकास ५ कोटी, द्वितीय क्रमांकास ३ कोटी आणि तृतीय क्रमांकास २ कोटी रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येतील, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांनी आज पुण्यात केली.




बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या उद्घाटन सोहळ्यास शालेय विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदकुमार बेडसे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, शिक्षण संचालनालय (योजना) पुणेचे संचालक कृष्णकुमार पाटील, बालभारती पाठ्यपुस्तक मंडळाच्या संचालक अनुराधा ओक, सीईओ अँड हेड ऑफ परख सेल छउएठढ नवी दिल्लीच्या प्रा. इंद्राणी भादुरी, विविध जिल्ह्यांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त, सहसंचालक, उपसंचालक, प्राचार्य तसेच शिक्षण विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोंढव्यात आर्थिक वादातून शाळकरी मुलावर शस्त्राने वार

**पुणे :** आर्थिक वादातून १४ वर्षीय शाळकरी मुलावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना कोंढवा भागात घडली. खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी पोलिसांनी दाम्पत्याला अटक केली. या प्रकरणी शाहरुख मोहम्मदीन फिरोज खान, मरियम शाहरुख खान (दोघे रा. हुमेरा मंजिल, शेर खान चाळीसमोर, कोंढवा) यांना अटक करण्यात आली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलाच्या वडिलांचे आरोपी शाहरूख याच्याशी आर्थिक व्यवहारावरून वाद झाले होते. सोमवारी (२२ सप्टेंबर) रात्री पावणेदहाच्या सुमारास आरोपी शाहरुख आणि त्याची पत्नी मरियम हे त्याच्या घरी गेले आणि शिवीगाळ केली. त्यावेळी आरोपींनी अल्पवयीन मुलाच्या आईला मारहाण केली. तेव्हा अल्पवयीन मुलाने मध्यस्थी केली. आरोपींनी मुलाला शिवीगाळ करुन त्याच्या छातीवर शस्त्राने वार केले. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांचा परवाना होणार निलंबित

**मुंबई :** राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे प्रकार वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. महसुलाची तसेच पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी तसेच अनधिकृतपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांचा परवाना निलंबित करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करुन अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पहिल्या गुन्ह्यासाठी पुढील ३० दिवसापर्यंत परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवण्याची कारवाई करण्यात येत आहे. याच विषयाशी संबंधित दुसऱ्या गुन्ह्यासाठी पुढील ६० दिवसापर्यंत परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवण्यात येत आहे. तसेच याच संदर्भातील तिसऱ्या गुन्ह्यासाठी वाहन अटकाव करुन संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करुन सकल भारक्षमतेपेक्षा (जी.व्ही. डब्ल्यु.) अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची मालाची वाहतूक करणाऱ्या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत.

# पत्नीच्या त्रासाला कंटाळून तरुणाची आत्महत्या; येरवडा पोलीस ठाण्यात पत्नीसह सासूविरुद्ध गुन्हा

**पुणे :** पत्नीच्या त्रासाला कंटाळून तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना येरवडा भागात घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन पत्नीसह तिच्या आईविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पत्नीच्या त्रासामुळे आत्महत्या केलेल्या तरुणाचे वय २६ वर्ष असून, तो येरवडा परिसरातील गणेशनगर भागात राहायला आहे. याबाबत त्याच्या आईने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पत्नी, तसेच तिच्या आईविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणाचा आरोपी तरुणीशी सहा महिन्यांपूर्वी विवाह झाला होता. तरुणी मूळची बीड जिल्ह्यातील गेवराई येथील आहे. विवाहानंतर तरुणी आणि तिच्या आईने तरुणाला आई-वडिलांपासून वेगळे राहण्यास सांगितले. वेगळे राहण्यासाठी त्याच्यावर दबाब आणला. त्याच्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या. पत्नी आणि सासूच्या त्रासाला कंटाळून तरुणाने १९ सप्टेंबर रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

पत्नी आणि सासूच्या त्रासामुळे मुलगा अक्षयने आत्महत्या केल्याचे त्याच्या आईने फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक दळवी तपास करत आहेत. पत्नी आणि नातेवाईकांच्या त्रासामुळे आत्महत्या केल्याच्या घटना यापूर्वी शहरात घडल्या आहेत. आठवड्यापूर्वी सिंहगड रस्ता भागातील एका विवाहित तरुणाने महिलेच्या त्रासामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली होती. महिलेने त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्याच्याकडे पैशांची मागणी केली होती. पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची धमकी देऊन त्याच्याकडून वेळोवेळी पैसे उकळले होते. महिला, तसेच तिच्या साथीदारांच्या त्रासामुळे तरुणाने आत्महत्या केली. या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.